

# डेव्हिड लिव्हिंगस्टन

# डेव्हिड लिव्हिंगस्टन

लिव्हिंगस्टन एक धर्मप्रचारक म्हणून आफ्रिकेला गेले. पण तेथील लोकांचे धर्मांतर करण्यात अडचणी आल्यामुळे नाउमेद होऊन त्यांनी आफ्रिकेची शोधमोहीम सुरू केली. व्यापाऱ्यांना आफ्रिकेची दारे खुली केली तर गुलामांचा व्यापार बंद होईल, अशी त्यांची समजूत होती. त्यांच्या मोहिमेच्या बातम्यांनी त्यांना इंग्लंडमध्ये खूप नावलौकीक मिळवून दिला. पण त्यांचे शोधकार्य फार यशस्वी ठरले नाही. त्यांना नाईल नदीचा उगम शोधण्यात अपयश आले. तरीही त्यांना इतिहासातील सर्वाधिक प्रसिद्ध शोधकांमध्ये गणले जाते.

डेव्हिड लिव्हिंगस्टन याचा जन्म 1813 साली स्कॉटलंडमधील ग्लासगो शहरानजिक झाला. त्याचे आईवडील खूप गरीब होते. एकच खोली असलेल्या घरात त्यांच्या कुटुंबातील सात जण राहात. वयाच्या दहाव्या वर्षी डेव्हिड जवळच्या कापड गिरणीत मजुरी करू लागला. तिथे सकाळी सहा वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत मान मोडून काम करावे लागे. फक्त रविवारी सुट्टी असे. गिरणीत कमालीचे उकडत असे. कापसाचा धागा तुटणार नाही, याकडे लक्ष द्यायचे काम लहान मुलांना करावे लागे. हे काम करताना त्यांना धोकादायक यंत्रांच्या मधून वाट काढत, वाकून तर कधी सरपटत चालावे लागे. कामात काही चूक झाली तर त्यांना मार मिळत असे.

एवढ्या लहान वयात आणि असुरक्षित वातावरणात राहूनही डेव्हिडने स्वत:ला सिद्ध करून दाखवले. दिवसभर कठोर परिश्रम करून झाल्यावर पुन्हा शाळेत जाऊन शिकणे तसे कठीणच! पण डेव्हिड शाळेत न जाता शिकला. कामावरून घरी परतल्यावर तो मध्यरात्रीपर्यंत जागून वाचन करत बसे. हळूहळू तो लिहायला-वाचायला शिकला. मग तो लॅटीन भाषाही शिकू लागला. डेव्हिडची ही चिकाटी खरोखरच थक्क करणारी आहे.

वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत डेव्हिड याच पद्धतीने स्वत:हून शिकला. त्याच्या वडिलांकडून त्याला धार्मिक संस्काराचे बाळकडू मिळाले. त्यातून त्याला शिकण्याची प्रेरणा मिळत असे. एक दिवस त्याच्या आयुष्याने एक वेगळेच वळण घेतले. एका जाहिरातीत धर्मप्रसारक डॉक्टरांनी चीनमध्ये जाऊन काम करावे, असे आवाहन केले होते. डेव्हिडला वाटू लागले की हे त्याच्यासाठी अगदी योग्य काम आहे.

धर्मप्रसारक बनण्याआधी लिव्हिंगस्टनला ग्लासगो विद्यापीठात वैद्यकीय शिक्षण घ्यावे लागले. त्यानंतर, *लंडन मिशनरी सोसायटी*ने त्याला धर्मप्रसाराचे प्रशिक्षण दिले. 1840 सालापर्यंत त्याची तयारी पूर्ण झाली. पण त्याच वर्षी चीन आणि इंग्लंडमध्ये *अफूचे युद्ध* सुरू झाले, त्यामुळे तो चीनला जाऊ शकला नाही. रॉबर्ट मोफ्फट नावाच्या प्रसिद्ध धर्मप्रसारकराच्या भेटीतून प्रेरणा मिळून त्याने आफ्रिकेला जाण्याचा निर्णय घेतला. अशाप्रकारे, डोक्यात अनेक कल्पना घेऊन त्याने त्याचे घर कायमचे सोडले आणि तो केपटाऊनला जाणाऱ्या जहाजात बसला.



रॉबर्ट मोफ्फटचे चित्र. यांनीच डेव्हिड लिव्हिंगस्टनला आफ्रिकेत जाऊन धर्मप्रसाराचे काम करण्याची प्रेरणा दिली.

# आफ्रिका पादाक्रांत करणारा पहिला इंग्रज

आफ्रिकेत आगमन.....तेथील मूळ जमातींचे धर्मांतर करण्यात अपयश.....मध्य आफ्रिकेत भटकंती करण्याची इच्छा...एका सिंहाचा हल्ला....मेरी मोफ्फटशी लग्न....नगामी सरोवराचा शोध....कुटुंबियांना पुन्हा इंग्लंडमध्ये पाठवले....झांबेसी नदीचे शोधकार्य....व्हिक्टोरिया धबधब्याचा शोध....संपूर्ण आफ्रिका पादाक्रांत....लंडन मिशनरी सोसायटीकडून सन्मान व मेजवानी....कुटुंबियांना वेळ देऊ शकला नाही.

परंतु केपटाउन शहरापासून 960 किमी दूर उत्तरेला कुरुमान गावात पोहोचल्यावर त्याला धक्का बसला. खरंतर, कुरुमान हे एखाद्या गलिच्छ गावासारखेच छोटेसे शहर होते आणि मोफ्फट तिथे वीस वर्षे राहीला होता. तरीही तेथील जमातीतील कुणी ख्रिस्ती धर्म स्वीकारला नव्हता.

पुढची तीन वर्षे लिव्हिंगस्टनने उत्तर भागात अनेक दौरे केले. त्याने तेथील मूळ जमातींचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश मिळाले नाही. पण या अनुभवाने त्याला आफ्रिकन लोकांची मनोवृत्ती कळली. त्यामुळे त्याने धर्मप्रसाराचे कार्य करण्याचा विचार सोडून दिला. इंग्रज लोक आफ्रिकेच्या ज्या भागात अद्याप पोहोचलेले नाहीत, ते भाग शोधून काढायचे त्याने ठरवले. त्याला वाटे, इंग्रज व्यापाऱ्यांनी या भागांमध्ये आपला व्यापार सुरू केला तर आफ्रिकन गुलामांची खरेदी-विक्री बंद होईल आणि गोऱ्या लोकांना तिथे स्थायिक होता येईल.

दरम्यान, लिव्हिंगस्टनवर एका सिंहाने हल्ला केल्यामुळे त्याला गंभीर इजा झाली. त्यामुळे त्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण व्हायला उशीर झाला. लवकरच तो बरा झाला पण त्याचा डावा हात कायमचा दुबळा झाला. याच काळात त्याचे मोफ्फटची मुलगी मेरीशी लग्न ठरले. हा काही प्रेमविवाह नव्हता. पण मेरीने धर्मप्रसारकाचे आयुष्य जवळून अनुभवले होते आणि ती आपल्याशी चांगले जुळवून घेईल, असे त्याला वाटले.

लिव्हिंगस्टन सिंहाच्या हल्ल्यातून बचावला. पण त्याचा डावा हात कायमचा दुबळा झाला.



धर्मप्रसाराच्या कार्यात अपयशी ठरल्याने लिव्हिंगस्टन अस्वस्थ झाला. त्याचवेळी त्याला उत्तर भागात एक मोठे सरोवर असल्याचे कळले. तिथे जाण्यासाठी त्याने त्वरित एका मोहीमेची तयारी सुरू केली. 1849 साली त्याने रखरखीत कलहारी वाळवंटातून प्रवास केला आणि त्या सरोवरापर्यंत पोहोचला. तेथील मूळ जमाती त्याला *नगामी सरोवर* म्हणत.

हा काही फार मोठा शोध नव्हता. पण आणखी उत्तरेला गेलो तर तिथे एक मोठी नदी मिळू शकते, याबद्दल लिव्हिंगस्टनला खात्री वाटू लागली. युरोपमधील व्यापाऱ्यांना मध्य आफ्रिकेत आणण्यासाठी ही नदी एक आदर्श मार्ग ठरू शकेल, असे त्याला वाटले. त्यामुळे ही नदी शोधण्याचा त्याने ध्यास घेतला.

या काळात, लिव्हिंगस्टन आपल्या कुटुंबियांची फारशी काळजी करत नसे. तो केवळ आफ्रिकेच्या विचारांनी झपाटलेला असे. कुटुंबियांना त्याने इंग्लंडला पाठवून दिले. इंग्लंडमध्ये त्यांना राहायला ना घर होते ना पैसा! पण ते मलेरिया आजारापासून तिथे सुरक्षित होते. अखेरीस, लिव्हिंगस्टनला ती नदी सापडली. नदीचे नाव होते, झांबेसी. त्याने लिनिआन्ती या नवीन ठिकाणी तळ ठोकला. या शोधाने उत्साह वाढून नदीत आणखी शोधकार्य करण्यासाठी त्याने नवीन मोहीम आखली.


नगामी सरोवरावर लिव्हिंगस्टनचे आगमन. या शोधाने त्याला आपली शोधमोहीम पुढे सुरू ठेवण्यास प्रेरणा दिली.



व्हिक्टोरिया धबधब्याचे नेत्रदीपक दृश्य! झांबेसी नदीच्या मोहिमेदरम्यान लिव्हिंगस्टनने याचा शोध लावला.

आदिवासींचा एक लहानसा गट घेऊन लिव्हिंगस्टन पश्चिमेकडे चालू लागला. गर्द जंगले, त्यातील हिंस्त्र मूळ जमाती, मलेरिया आणि आमांश या आजारांचे आक्रमण अशा संकटांना तोंड देत सहा महिन्यांनंतर ते अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावर पोहोचले.

## इंग्लंडचा हीरो

लिव्हिंगस्टनला तात्काळ जाणवले की मध्य आफ्रिकेत पोहोचण्यासाठी हा मार्ग व्यापाऱ्यांसाठी धोकादायक आहे. मग आजारातून बरे झाल्यावर लिव्हिंगस्टन लिनिआन्तीला परतला आणि नदीमार्गाने पूर्व किनाऱ्याकडे निघाला. मार्गात त्याला एक महाकाय, मंत्रमुग्ध करणारा धबधबा दिसला. त्याने त्याचे नामकरण *व्हिक्टोरिया* धबधबा असे केले. नदीतून नावेने मध्य आफ्रिकेत जाताना हा धबधबा अडथळा ठरू शकतो, हे त्याला जाणवले. 1856 पर्यंत त्याने संपूर्ण आफ्रिका खंडाचा दौरा केला. असा शोधप्रवास करणारा तो पहिलाच इंग्रज व्यक्ती होता.



आपल्या शोध मोहिमेदरम्यान लिव्हिंगस्टनने अनेक संकटे झेलली. इथे एक पाणघोडा त्यांची नाव उलटण्याचा प्रयत्न करत आहे.

अटलांटिक समुद्रकिनारी पोहोचल्यावर लिव्हिंगस्टनला एक शाही जहाज दिसले. ते त्याला इंग्लंडला घेऊन जाण्यासाठी पाठवण्यात आले होते. इंग्लंडमध्ये तो एक मोठी मातब्बर व्यक्ती बनला होता. पण त्याच्याबाबत जे काही लिहिले गेले होते, त्यातील बरेचसे दिशाभूल करणारे होते. उदाहरणार्थ, त्याने बऱ्याच आफ्रिकन लोकांचे धर्मांतर घडवून त्यांना ख्रिस्ती बनवले. या अफवांमुळे लोक त्याला एखाद्या संतासारखे मानू लागले.

लंडनमध्ये त्याच्यासाठी मेजवान्या आयोजित करण्यात आल्या. त्याला अनेक पुरस्कार आणि पदकांनी गौरवण्यात आले. घराबाहेर पडून रस्त्यावर चालणे त्याला कठीण झाले. कारण लोक त्याचा समुद्री वाऱ्याने रापलेला चेहरा आणि त्याची प्रसिद्ध टोपी चटकन ओळखत. मात्र आपल्या दु:खी कुटुंबियांना देण्यासाठी त्याच्याकडे वेळ नसे, ही विषण्ण करणारी गोष्ट होती.

# झांबेसी मोहिमेचे अपयश

लिव्हिंगस्टनकडे झांबेसी मोहिमेचे नेतृत्व ....सुरुवातीपासूनच अडथळे....नदीच्या वेगवान प्रवाहामुळे योजनेत बदल....शाइर नदीचा शोधप्रवास....न्यासा सरोवराचा शोध...मलेरियामुळे धर्मप्रसारकांचा मृत्यू....पत्नीचे निधन...मोहीम अर्धवट सोडून इंग्लंडला परत....बाथ शहरात बर्टनच्या सभेत उपस्थित..........
नाईल नदीचा उगम शोधण्याच्या मोहिमेसाठी निमंत्रण....अल्बर्ट सरोवराच्या दक्षिणेला हा उगम असल्याची खात्री.

लवकरच लिव्हिंगस्टन पुन्हा आफ्रिकेत परतला. झांबेसी नदीद्वारे व्यापार मार्ग खुला करण्याची त्याची योजना ब्रिटिश सरकारला पसंत पडली. यामुळे आफ्रिकेच्या उत्तर भागातील सुपीक जमिनीवर गोऱ्या लोकांची वसाहत होऊ शकणार होती. सरकारने लिव्हिंगस्टनला या मोहिमेचे नेतृत्व देऊन तेथील ब्रिटिश राजदूत म्हणून नियुक्त केले. या मोहिमेत वाफेवर चालणाऱ्या बोटीतून प्रवास करून वसाहतीसाठी जागा शोधायच्या होत्या.

1858 साली लिव्हिंगस्टन आपली पत्नी आणि सात युरोपीयन लोकांना घेऊन मोहिमेवर निघाला. पण सुरुवातीपासूनच या प्रवासात विघ्ने येऊ लागली. त्यांच्या आगबोटीचा वेग खूप धीमा होता. बोटीत जागा अपुरी होती. बोट चालवायला जास्त इंधन लागत होते. शिवाय, मोहिमेदरम्यान खलाशांना मलेरिया आणि आमांश आजारांनी ग्रासले. लिव्हिंगस्टन हा चांगले नेतृत्व करू शकला नाही. तो आपल्या चुका स्वीकारत नसे. त्याला आजारी खलाशांची पर्वा नसे. शेवटी तर त्याने सगळ्यांशी बोलणेच टाकून दिले.

लिव्हिंगस्टनचे एक चित्र. आफ्रिकेतील मोहिमेने त्याला एक महान व्यक्ती बनवले.



यापेक्षा वाईट गोष्ट म्हणजे, पुढे येणाऱ्या संकटांची त्याने काहीच तयारी केली नाही. त्याने मलेरियाच्या धोक्याचा विचारही केला नाही. समुद्रकिनाऱ्यापासून शंभर-दोनशे मैल दूरवर वेगवान प्रवाह असल्यामुळे नदीत पुढे प्रवास करणे असंभव होते. कोणतेही व्यापारी जहाज वेगवान प्रवाहांचा हा प्रदेश ओलांडून पुढे जाऊ शकत नव्हते. लिव्हिंगस्टनने घाईघाईत एक नवीन योजना आखली आणि झांबेसीची प्रमुख उपनदी शाइरचा शोधप्रवास करायचे ठरवले. पण शाइर नदीतही वेगवान प्रवाह असल्यामुळे तो पुढे जाऊ शकला नाही. आपल्या स्वप्नांचा चक्काचूर झाल्यागत त्याला वाटले.



धर्मप्रसारासाठी इंग्लंडहून आफ्रिकत जाण्याआधी बिशप मॅकेन्झी यांचे घेतलेले छायाचित्र.

परंतु शाइर नदीच्या मोहिमेदरम्यान त्याला एक यश मिळाले. तो महाकाय न्यासा सरोवराजवळ पोहोचण्यात यशस्वी झाला. अर्थात, तिथे पोहोचणारा तो पहिला गोरा व्यक्ती नव्हता. पोर्तुगीज लोकांनी तिथे आधीच गुलामांच्या व्यापाराचे केंद्र स्थापन केले होते. शेवटचा प्रयत्न म्हणून लिव्हिंगस्टनने इंग्लंड सरकारला सुट्या भागांच्या स्वरुपात एक आगबोट पाठवण्याची विनंती केली. वेगवान प्रवाह पार करून पुढे गेल्यावर हे सुटे भाग जोडून नवीन आगबोट तयार करता आली असती.



लिव्हिंगस्टन रोजनिशी लिहीत असताना. यात त्याने आफ्रिकेतील मोहिमांचे बारीकसारीक तपशील लिहिले.
.

याच वेळी चारही बाजुंनी संकटे कोसळली. लिव्हिंगस्टनच्या उत्साहाने स्फूर्ती मिळून बिशप मॅकेन्झी इंग्लंडहून आले आणि त्यांनी तिथे धर्मप्रसाराचे केंद्र उभारले. पण लवकरच ते आणि त्यांचे सहकारी मलेरिया आजाराने मरण पावले. एका दीर्घ परंतु दु:खी वैवाहिक जीवनानंतर मेरी लिव्हिंगस्टनचेही मलेरियाने निधन झाले. लिव्हिंगस्टनला नदीत पुढे जाणे जवळजवळ अशक्य झाले आणि सहकारी कधीही बंड करतील अशी शक्यता वाटू लागली. अगोदरच दोन युरोपीयन सहकारी राजीनामा देऊन गेले होते. या गोष्टीचा राग येऊन लिव्हिंगस्टनने आणखी दोन जणांना मोहिमेतून काढून टाकले.

शेवटी त्याने माघार घेतली आणि मोहिम अर्धवट सोडून तो इंग्लंडला परतला. या वेळी त्याचे पूर्वीसारखे स्वागत झाले नाही. पत्नीच्या वियोगाने दु:खी असतानाच मोठा मुलगा रॉबर्ट अमेरिकन नागरी युद्धात जखमी होऊन मरण पावल्याची खबर त्याला याचवेळी मिळाली.



भुकेल्या-तहानल्या, गुलामांना पुढे चालणे अशक्य झाल्याने त्यांच्या अरब मालकांनी त्यांना तिथेच मरण्यासाठी सोडून दिले.

## लिव्हिंगस्टनची चूक

पण लवकरच त्याचे संपूर्ण लक्ष आणि उर्जा एका नवीन मोहिमेवर केंद्रित झाले. 1864 साली तो बाथ शहरात एका सभेत उपस्थित राहिला. या सभेत स्पेक आणि बर्टन या दोन व्यक्तिंमध्ये नाईल नदीच्या उगमावर वाद रंगणार होता. पण स्पेकच्या दुर्दैवी मृत्युमुळे नाईल नदीच्या उगमाचे गूढ अधिकच गहिरे झाले. सर रॉड्रिक मुरचिसनने हे गूढ उकलण्याचा एक शेवटचा प्रयत्न म्हणून लिव्हिंगस्टनला आफ्रिकेत परतण्याची विनंती केली.

लिव्हिंगस्टन या रहस्याबाबत त्याच्या स्वत:च्या कल्पनांवर काम करू लागला. नाईल नदी व्हिक्टोरिया सरोवरातून उगम पावते, हे स्पेकचे मत त्याला मान्य नव्हते. नाईल नदी अल्बर्ट सरोवरातून उगम पावते, हे सर सॅम्युअल बेकर यांनी अलिकडेच सिद्ध केले होते. लिव्हिंगस्टनला खात्री होती की नाईल नदीचा उगम अल्बर्ट सरोवराच्या दक्षिणेकडे कुठेतरी होतो, कदाचित टांगानिका सरोवरात!

पण त्याचा अंदाज चुकला. (1873 साली) ही चूकच पुढे त्याच्या मृत्युचे कारण बनली.

# नाईल नदीच्या उगमाचा निर्णायक शोध

झांजीबारहून न्यासा सरोवराकडे प्रयाण....लिव्हिंगस्टनला आमांश....टांगानिका सरोवरावर आगमन....गुलामांचा व्यापार करणाऱ्या अरबांकडून मदतीचा स्वीकार....लुअलाबा नदीतून नाईलचा उगम होतो, याची खात्री....मार्ग बदलून उजिजीला जाण्यास मजबूर....गुलामांची कत्तल पाहून स्तंभित....स्टॅनलेची भेट....टांगानिका सरोवरात नाईलचा उगम होत नाही हे सिद्ध....लुअलाबा नदीची शोधमोहीम सुरू असतानाच मृत्यू.

स्पेक आणि बर्टनप्रमाणेच लिव्हिंगस्टनने आपली मोहीम झांजीबारहून सुरू केली. पण तो दक्षिणेपासून बराच दूर असलेल्या किनाऱ्यावर पोहोचला. त्याच्या गटात फक्त चाळीस हमाल होते. त्यांपैकी काही मुंबईहून भरती केलेले भारतीय होते, पण कुणी युरोपीयन नव्हता. कारण लिव्हिंगस्टनला इतर गोऱ्या लोकांसोबत प्रवास करायला आवडत नसे. त्याचा सर्वात जवळचा सोबती होता *चिटेन* नावाचा एक छोटासा कुत्रा!

नेहमीसारखाच प्रवास धीम्या गतीने सुरू झाला. त्यांना एका गर्द जंगलातून प्रवास करावा लागला. भारतीय हमालांना मोहिमेपेक्षा वस्तूंची चोरी करण्यात जास्त रस होता. न्यासा सरोवरावर पोहोचेपर्यंत त्यांच्या गटात केवळ बारा लोक उरले. लिव्हिंगस्टनला पुन्हा आमांश आजाराने घेरले. त्याला आता आयुष्यभर हे आजारपण घेऊनच प्रवास करायचा होता.

परिस्थिती अधिकाधिक बिकट होत गेली. लिव्हिंगस्टनच्या औषधांचा खोका चोरीला गेला. त्याला मलेरिया होण्याची सतत काळजी वाटत होती. आता क्विनाईन हे रामबाण औषध जवळ नसल्यामुळे त्याला मलेरियाला तोंड देणे कठीण झाले. त्यांच्या खाण्या-पिण्याचे जिन्नस संपत आले. त्याचा लाडका कुत्रा नदी पार करत असताना बुडाला. एवढे सगळे होऊनही, लिव्हिंगस्टनची दुर्दम्य इच्छाशक्ती मात्र कायम होती. त्याने आपली मोहीम सुरुच ठेवली. वर्षभरानंतर तो टांगानिका सरोवराच्या दक्षिण किनाऱ्यावरील एका गावात पोहोचला.

लिव्हिंगस्टनच्या हमालांवर रानटी म्हशींनी हल्ला केला.



जमातीचा प्रमुख चितापांगा मोठ्या आदरपूर्वक आणि समारंभपूर्वक लिव्हिंगस्टनचे स्वागत करताना.



गुलामगिरी प्रथा अमान्य असूनही तिथे त्याने गुलामांचा व्यापार करणाऱ्या अरब लोकांकडून मदत स्वीकारली. त्यांनी अन्न आणि औषधे पुरवले नसते तर तापाने त्याचा जीवही घेतला असता. उपचारादरम्यान त्याने पश्चिम दिशेला असलेल्या एका लहान सरोवराबाबत ऐकले आणि त्याचा उत्साह वाढला. तिथे पोहोचल्यावर त्या सरोवराच्या उत्तर किनाऱ्यावरून एक रुंद पात्र असलेली नदी उगम पावत असल्याचे त्याला दिसले. ते बघून तो आनंदीत झाला. “ही लुअलाबा नावाने ओळखली जाणारी नदी दीर्घकाळापासून रेंगाळलेल्या प्रश्नाचे उत्तर आहे, हे उघड आहे. ही नदी उत्तर दिशेला जात आहे. तर मग ती अल्बर्ट सरोवराला नाही मिळणार तर कुणाला मिळणार? तिथे ही नदी नाईल नदी बनून पुढे वाहाते,” त्याचे तर्क-वितर्क सुरू झाले.



आजाराने अशक्त झालेला लिव्हिंगस्टन आफ्रिकी वाटाड्यांसोबत प्रवास करताना.

## गुलामांची कत्तल

पण ही एक सहजपणे घडलेली चूक होती. लुअलाबा नदी अल्बर्ट सरोवराकडे जातच नाही, उलट ती पश्चिमेला वळून तिचा शेवट कांगो नदीत होतो, हे लिव्हिंगस्टनला कळणे अशक्य होते. आणि हे कळेपर्यंत, या शोधकाची उरलीसुरली उर्जा स्वत:ची कल्पना सिद्ध करण्याचत खर्च झाली होती.

सर्वात आधी, लिव्हिंगस्टनला लुअलाबाच्या उगमाचा शोध घ्यायचा होता. दक्षिण दिशेला गेल्यावर त्याला आणखी एक मोठे सरोवर दिसले. इथेच नाईलचा उगम होतो, असे त्याला वाटले. साहजिकच, त्याने लुअलाबाच्या प्रवाहाचा पाठलाग केला. लुअलाबा नदी अल्बर्ट सरोवराला जाऊन मिळते, अशी त्याची खात्री पटली.



टांगानिका सरोवराकाठी वसलेले उजिजी गावाचे दृश्य. इथेच 1872 साली लिव्हिंगस्टन आणि स्टॅनले यांची भेट झाली.

पण आता त्याच्याकडे अन्न आणि औषधांचा गंभीर तुटवडा झाला. नाईलाजास्तव, मार्ग बदलून तो टांगानिका सरोवराकाठी असलेल्या उजिजी गावात गेला. तिथे पुढच्या प्रवासासाठी पुरेशी रसद मिळू शकेल, असे त्याला वाटले.

ताप आणि आमांशाबरोबरच, लिव्हिंगस्टनच्या उजव्या फुफ्फुसाला न्यूमोनिया आजाराने ग्रासले. त्याच्या तोंडातून खोकल्याबरोबर रक्त पडू लागले. उजिजीला जाताना शेवटचे काही मैल त्याला स्ट्रेचरवर झोपवून नेण्यात आले. पण उजिजीत आणखी एक संकट त्यांची वाट पाहात होते. समुद्रकिनाऱ्यावरून त्यांच्यासाठी पाठवलेली रसद लुटण्यात आली होती. चिठ्या-पत्रे, अन्न, जीवनाश्यक वस्तू आणि कहर म्हणजे औषधेसुद्धा आता त्यांना मिळणार नव्हती.

लिव्हिंगस्टनवर आभाळच कोसळले, पण त्याने हार मानली नाही. काही महिने आराम केल्यावर तो लुअलाबा सरोवराच्या किनाऱ्यावरील न्यांगवे गावात गेला. तिथे त्याला एक मोठाच धक्का बसला. अरब व्यापाऱ्यांनी सुमारे पाचशेपेक्षा जास्त गुलामांची कत्तल केली होती. अनेक गुलामांनी कत्तल टाळण्यासाठी नदीत बुडून जीव दिला होता. लिव्हिंगस्टनने रोजनिशीत नोंद केली: 'त्या क्षणी मला नरकात असल्यासारखं वाटलं.'

# एक प्रसिद्ध भेट




*डॉ.लिव्हिंगस्टनचे जीवन चरित्र आणि त्यांच्या शोधमोहिमा*
या पुस्तकाचे मुखपृष्ठ.

लिव्हिंगस्टनने आपल्या मोहिमेच्या अहवालासोबत गुलामांच्या कत्तलीचे विवरणही ब्रिटिश सरकारकडे पाठवून दिले. यामुळे ब्रिटनमध्ये खळबळ माजली. ब्रिटिश सरकारने आपल्या साम्राज्यात 1833 सालीच गुलामांचा व्यापार बंद केला होता. पण तरीही गुलामांची खरेदी-विक्री सुरुच होती. गुलामांना जहाजाने आणले-नेले जात होते. लिव्हिंगस्टनच्या अहवालामुळे ब्रिटनने झांजीबारच्या सुलतानावर दडपण आणले. यामुळे 1873 साली झांजीबारमध्ये गुलामांचा व्यापार बंद झाला.

थकला-भागला लिव्हिंगस्टन पुन्हा उजिजीला परतला. आता त्याच्याकडे काही रसद शिल्लक नव्हती. गुलामांचा व्यापार करत असल्यामुळे तो खरंतर अरब व्यापाऱ्यांचा तिरस्कार करत असे. पण आता त्यांच्याचकडून त्याला मदतीची याचना करावी लागली. आपली मोहीम सुरू ठेवणे त्याला अशक्य वाटू लागले. त्याचवेळी एक गोरी व्यक्ती उजिजीला येत आहे, ही बातमी त्याने ऐकली आणि तो अचंबित झाला. तीन दिवसांनंतर मोठ्या समारंभपूर्वक तो अनोळखी गोरा माणूस तिथे पोहोचला. त्याने असहाय अवस्थेत असलेल्या लिव्हिंगस्टनला पाहिले आणि त्याच्या तोंडून शोधमोहिमांच्या इतिहासातील सुप्रसिद्ध उद्गार बाहेर पडले: “डॉक्टर लिव्हिंगस्टन, तुम्हीच ना?”



हे चर्च झांजीबारमध्ये पूर्वी जेथे गुलामाचा बाजार भरत असे, तेथे उभारले आहे.



स्टॅनले आणि लिव्हिंगस्टन टांगानिका सरोवरात शोधप्रवास करताना. एक नदी या सरोवराला येऊन मिळते, हे त्यांना आढळले.

लिव्हिंगस्टनला पालखीतून चिटंबो गावात नेत आहेत.



ती अनोळखी व्यक्ती खरंतर एक पत्रकार *हेन्री मॉर्टन स्टॅनले* होता. लिव्हिंगस्टन अद्याप जिवंत आहे की नाही, हे पाहाण्यासाठी त्याला आफ्रिकेत पाठवण्यात आले होते. स्टॅनलेचा दीर्घ प्रवास आणि त्याने केलेले लिव्हिंगस्टनच्या मोहिमेचे वर्णन यांनी इंग्लंडमध्ये पुन्हा खळबळ उडाली. लिव्हिंगस्टनला लोकांनी पुन्हा नायकाचा दर्जा दिला. त्याच्या मोहिमेला संपूर्ण आर्थिक मदत देण्यात आली. त्याने केलेल्या सर्व मागण्या पूर्ण करण्यात आल्या.

## मोहिमेतील अखेरचा प्रवास

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, स्टॅनलेच्या आगमनामुळे लिव्हिंगस्टनला जाणीव झाली की बाहेरचे जग त्याला विसरलेले नाही. त्याच्या अंगात पुन्हा नवा उत्साह संचारला. लवकरच, त्याच्यात आणि स्टॅनलेमध्ये मैत्री झाली. हा पहिलाच गोरा माणूस होता ज्याच्यासोबत लिव्हिंगस्टनचा वाद झाला नाही. दोघांनी मिळून टांगानिका सरोवराच्या उत्तर भागाचा प्रवास केला. तिथे त्यांना एक नदी दिसली. ती सरोवराला येऊन मिळत होती. त्यावरून, टांगानिका सरोवरातून नाईल नदीचा उगम होत नाही, हे सिद्ध झाले.



लिव्हिंगस्टनचे निधन झाले त्या चिटंबो गावाचे स्थान दर्शवणारा नकाशा.

1873 साली स्टॅनले इंग्लंडला परतला तेव्हा लिव्हिंगस्टनला वाईट वाटले. मग त्याने लुअलाबा नदीच्या मार्गाची शोधमोहीम सुरू करायचे ठरवले. काही काळ रसद आणि हमाल येण्याची वाट पाहाण्यात गेला. ते आल्यावर तो नाईलचा उगम शोधण्यासाठी दक्षिणेकडे निघाला.

पण अनेक वर्षांचा खडतर प्रवास, आजार आणि कुपोषण यांमुळे लिव्हिंगस्टनच्या आरोग्य खूप खालावले होते. तो खूप अशक्त झाला होता. सरोवराच्या पूर्वेकडील भाग दलदलयुक्त आणि दुर्गम होता. दररोज ते फक्त दोनच मैल अंतर कापू शकत होते. शेवटी *चिटंबो* गावात पोहोचल्यावर लिव्हिंगस्टन कोसळला आणि दोन दिवसांनी तिथेच त्याचा मृत्यू झाला.

त्याच्या उरल्यासुरल्या सहकाऱ्यांनी त्याच्या पार्थिवावर औषधी लेप लावून ते टिकवून ठेवले आणि त्याला समुद्रकिनारी आणले. तिथे एका ब्रिटिश युद्धनौकेवर पार्थिव चढवण्यात आले. इंग्लंडमध्ये या महान शोधकाचा अंतिम संस्कार एखाद्या महानायकासारखा करण्यात आला. लिव्हिंगस्टनचे पार्थिव लंडनमधील *वेस्टमिन्स्टर चर्च* येथे दफन करण्यात आले. आजही ते तिथे पाहायला मिळते.

## साल आणि घटना

1813: स्कॉटलंडमधील लो ब्लांटायर भागात डेव्हिड लिव्हिंगस्टनचा जन्म.
1840: *लंडन मिशनरी सोसायटी*ने दीक्षा दिल्यानंतर दक्षिण आफ्रिकेत प्रस्थान.
1849: कलहारी वाळवंट पार करून *नगामी* सरोवराची पहिली शोधमोहीम.
1856: संपूर्ण आफ्रिका खंडाचा प्रवास करून इंग्लंडला परत.
1858: इंग्लंडचे अस्थायी राजदूत म्हणून आफ्रिकेत नियुक्त. *झांबेसी*ची शोधमोहीम.
1864: नाईल नदीच्या उगमाचे गूढ उकलण्यासाठी *सर रॉड्रिक मुरचिसन*कडून निमंत्रण.
1865: इंग्लंडच्या फोकस्टोन बंदरातून प्रवास सुरू.
1866: *झांजीबार*मध्ये आगमन.
1868: बांगवुलू सरोवराचा शोध.
1869: *उजिजी*मध्ये आगमन.
1871: न्यांगवे येथे गुलामांची भयानक कत्तल पाहून भयचकित. उजिजीत स्टॅनलेची भेट.
1872: मोहीमेतील अखेरचा प्रवास.
1873: 1 मे रोजी बांगवुलू सरोवराच्या किनाऱ्यावरील *चिटंबो* गावात निधन.